वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत
वस्त्रोद्योग घटकांना व्याज सवलत वितरीत
करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक बैठक-/प्र.क्र.१८५/टेक्स-५**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २४ नोव्हेंबर,२०१४**

**वाचा :-**
१. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/प्र.क्र.१/टेक्स-२, दिनांक १ मार्च, २०१२
२. शासन शुध्दीसपत्रक समक्रमांक, दिनांक १२ मार्च, २०१२ आणि दिनांक १९ जुलै, २०१२.
३. शासन परिपत्रक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.१७८/ टेक्स-२, दिनांक १३ ऑगस्ट, २०१२
४. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२ / प्र.क्र.२५७/ टेक्स-२, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४/
५. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांची पत्रे क. ६६२३, दि.१२/०६/२०१४,
क्र.७१३९,७१४०,७१४२,७१३८,७१४३ दि. २४/०६/२०१४, क्र. ८९७०, ८९६९
दि. १३/०८/२०१४,क्र.९७०८,९७३४,९७११,९७०५,९७०७,९७२८,९७१८,
९७२६,९७१६,९७१७,९७२३,९७१५,९७१४,९७२५,९७१०,९७१८(१),९७२७,९७४०,९७२९,
९७१९,९७३७,९७३६,९७१२,९७३५,९७९४,९७३८,९७३१,९७३०,९७२२,९७२०,९७३२,
९७०९, ९७३९, ९७४१, ९७२४, ९७१३, ९७२१, ९७३३ दि. ०२/०९/२०१४,
क्र. ९७९०, ९७९१, ९७९५ दि. ०४/०९/२०१४,
क्र. १०८०२, १०८१७, १०८१८,१०८०१,१०७७५,१०८२०, १०८००, १०८०३, १०८१९,
दि. १०/१०/२०१४,
क्र. ११८१५,११८२२,११८१६,११८१७, ११८१८, ११८२०. ११८१९ दि.२८/१०/२०१४,
क्र. १२४७८,१२४७९,१२४८१, १२४८०, १२४८३, १२४८२ दि.१२/११/२०१४.

**प्रस्तावना :-**

वरील संदर्भीय अनुक्रमांक १ येथील दिनांक १ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याच्या नवीन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत TUFS शी निगडीत दिर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजना जाहिर करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत या शासन निर्णयासोबतच्या“परिशिष्ट-अ” मधील विवरणपत्र क्र.१ ते ६८ या प्रमाणे एकूण ६८ वस्त्रोद्योग घटकांना रू. ११,६०,३२,४९०/- व्याज सवलत वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत केंद्र पुरस्कृत TUFS शी निगडीत दिर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजनेअंतर्गत या शासन निर्णयासोबतच्या “परिशिष्ट-अ” मधील विवरणपत्र क्र.१ ते ६८ या प्रमाणे एकूण ६८ वस्त्रोद्योग घटकांना एकूण रु. ११,६०,३२,४९०/- ( अक्षरी रुपये अकरा कोटी साठ लक्ष बत्तीस हजार चारशे नव्वद फक्त ) इतकी रक्कम व्याज सवलतीपोटी मंजूर करुन वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू वस्त्रोद्योग घटकांना वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम योजनेच्या दिशानिर्देशानुसार या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेल्या बँकांच्या खात्यावर R.T.G.S. द्वारे वितरीत करण्यात यावी.

Scanned by CamScanner

३. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली व्याज सवलतीची रक्कम रू.११, ६०, ३२,४९०/- परिशिष्ट ब मधील बँकांनी या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-अ" मधील त्यांच्याशी संबंधित वस्त्रोद्योग घटकांच्या कर्ज खात्यात जमा करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. वरील प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम संबधित बँकेस वितरीत करण्याकरीता श्रीमती अ. अ. चुरी, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. दा.अं.कुलकर्णी ,उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या आदेशाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई येथून आहरीत करुन ती उपरोक्त बँकेस वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक व्ही-२, २८५१- ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (६४) केंद्र पुरस्कृत (TUF) योजनेशी संबंधित वस्त्रोद्योग प्रकल्पांसाठी दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याजासाठी अर्थसहाय्य योजना (२८५१ ५९८१) दत्तमत ३३, अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय, संदर्भिय अ.क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.१९/११/२०१४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार तसेच उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये वस्त्रोद्योग विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१४११२४१५२२०९५२०२ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Co-operation marketing and textiles department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2014.11.24 15:32:58 +05'30'

( र. अं.खडसे )
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
२) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५) अ.मु.स. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई(ई-मेल व्दारे)
६) अ.मु.स. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई(ई-मेल व्दारे)
७) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई(ई-मेल व्दारे)
८) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर. (ई-मेल व्दारे)
९) उप सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई(ई-मेल व्दारे)
१०) कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (३ प्रती / कार्यासन -१७ स)
११) प्रवर्तक, परिशिष्ट अ मधील वस्त्रोद्योग घटक (ई-मेल व्दारे)
१२) मॅनेजर, परिशिष्ट ब मधील बँक (टफ सेल) (ई-मेल व्दारे)
१३) संबंधित वस्त्रोद्योग घटकाच्या स्वतंत्र नस्ती
१४) निवड नस्ती (टेक्स-५)



Scanned by CamScanner